संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४३ वा ● ● रविवार ता. ०६ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021




## सांगलीत वनविभागाच्या भरतीत कॉपीचा प्रकार

सांगली : गुरुवारी सांगलीत झालेल्या वनविभागाच्या शिपाई पदासाठीच्या भरती परीक्षेत अतिशय चपळाईने कॉपी करणाऱ्या कॉपीबहाद्दराला रंगेहात पकडण्यात आले. वनविभागाच्या पथकाच्या निदर्शनास कॉपीचा प्रकार उघड झाल्यानंतर त्यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. तर कॉपी करणाऱ्या एकास अटक केली आहे. सदरचा प्रकार हा गुरुवार दि. ०३ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास एका मध्ये घडला. या प्रकरणी युवराज पाटील यांनी विश्रामबाग पोलिसात फिर्याद दिली आहे. अविनाश संजनसिंग गुमलाडू (रा. शिवगाव) आणि अर्जुन रतन नार्डे (रा. संजरपूर जि. औरंगाबाद) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. तर प्रकरणी अविनाश गुमलाडू याला अटक केली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरु असून यातून मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, सांगली ते मिरज रोडवरील वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडी अँड रिसर्च या कॉलेज मध्ये वनविभागाच्या शिपाई पदासाठीच्या भरतीचा पेपर गुरुवार दि. ०३ ऑगस्ट रोजी होता. दुपारच्या सुमारास पेपर सुरु झाल्यानंतर संशयित अविनाश गुमलाडू हा त्याच्या बुटामध्ये मोबाईल लपवून ठेऊन केसातून मोबाईल ब्ल्यूटुथ हेडफोन लपवून कॉपी करत पेपर लिहीत होता. मोबाईलवरून औरंगाबाद जिल्ह्यातील दुसरा संशयित अर्जुन नार्डे हा उत्तरे देत होता. यावेळी याठिकाणी असणाऱ्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास सदरची बाब येताच त्यांनी अविनाश याची कसून तपासणी केली असता त्याच्याकडे बनेन, मायक्रोफोन, मोबाईल, सँडल जोड, डिव्हाईस असा ३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल आढळला. यानंतर दोघांना विश्रामबाग पोलिसांच्या स्वाधीन केले. याठिकाणी पोलिसांनी संशयित गुमलाडू यांच्याकडे कसून चौकशी केली असता सदरचा मोबाईल आणि डिव्हाईस हे नार्डे याने दिले असून पेपर सुरु झाल्यानंतर तो याद्वारे उत्तरे देत असल्याचे सांगितले. यानंतर त्याच्याकडून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दोघांविरोधात परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला. दरम्यान, संशयित नार्डे याने अशा अनेक परीक्षेत अनेक उमेदवारांना कॉपी करून देत शासकीय नोकऱ्या मिळवून दिल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यादृष्टीने तपास सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितले.

## सांगलीत भरदिवसा घरफोडी : दागिन्यांसह ४९ हजारांचा मुद्देमाल लंपास

सांगली : शहरातील गावभाग परिसरात असणाऱ्या एका अपार्टमेंट मधील बंद फ्लॅट फोडून चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी केली. घरात ठेवलेल्या सोन्याचांदीच्या दागिन्यांसह एकूण ४९ हजारांचा मुद्देमाल चोरटयांनी लंपास केला. सदर घरफोडीची घटना हि शुक्रवार दि. ०४ ऑगस्ट रोजी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी संतोष विठ्ठल कोरे (वय ४३ रा मूळ अंजनी सध्या गावभाग सांगली) यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, संतोष विठ्ठल हे मूळचे तासगाव तालुक्यातील अंजनी येथील रहिवाशी आहेत. सध्या गावभाग परिसरातील जिजाचा मारुती मंदिर जवळील अपार्टमेंट मध्ये ते राहतात. शुक्रवार दि. ०४ ऑगस्ट रोजी ते घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. यावेळी अज्ञात चोरट्यांनी भर वस्तीत असणाऱ्या बंद फ्लॅटवर पाळत ठेऊन दरवाजाचे लॉक तोडून आत प्रवेश केला. फ्लॅट मधील बेडरूम मध्ये असणाऱ्या तिजोरीत ठेवलेले २० हजारांची सोन्याची अर्ध्या तोळे वजनाची अंगठी, २० हजारांचे अर्ध्या तोळ्याचे कानातील सोन्याची कर्णफुले, चार हजारांची चांदीची वाटी, एक हजारांचा चांदीचा चमचा चार हजार रुपये रोख असा एकूण ४९ हजारांचा मुद्देमाल चोरून पलायन केले. दुपारच्या सुमारास कोरे हे घरी परतले असता त्यांना दरवाजाचे कुलूप तुटल्याचे निदर्शनास आले. त्यांनी आत जाऊन पहिले असता दागिने आणि पैसे लंपास झाले होते. घडलेल्या या घटनेनंतर कोरे यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

## पोलिसांनी वेगवेगळ्या गुन्ह्यातील जप्त केलेला १ कोटी २० लाखांचा गांजा केला नष्ट

सांगली : जिल्ह्यातील वेगवेगळ्या ११ पोलीस ठाण्याकडील ४५ गुन्ह्यात जप्त केलेला १ कोटी २० लाखांचा १ टन २०५ किलो ३२२ ग्रॅम वजनाचा गांजा बॉयलर मध्ये पेटवून नष्ट करण्यात आला. पलूस तालुक्यातील भिलवडी इथल्या चितळे उद्योग समूहामध्ये पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या उपस्थितीत सदरची कारवाई करण्यात आली. न्यायालयसह पोलीस दलातील



अन्य विभागांची परवानगी घेऊन सदरची कार्यवाही करण्यात आली. सदरचा गांजा हा १९९८ ते २०२२ या कालावधीतील होता.

जिल्हा पोलीस दलाने गेल्या काही वर्षांमध्ये गांजासह अमली पदार्थांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली होती. वेगवेगळ्या ११ पोलीस ठाण्याकडील एन.डी.पी.एस. अॅक्ट लागवड, वाहतुक, विक्री, सेवन अशा वेगवेगळया दाखल असलेल्या गुन्हयातील सन १९९८ पासून ते सन २०२२ पर्यंतचा मुद्देमाल हा केंद्रीय अंमली पदार्थ गोडाउन मध्ये जमा करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे याबाबत पाठपुरावा करून सदरचा मुद्देमाल कायदयातील तरतुदीप्रमाणे नाश करण्याचे आदेशी दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने जप्त

(पान ५ वर)

## हत्या प्रकरणातील मृताच्या शरीराचे भाग सापडले

### अग्निशमन दल आणि स्पेशल रेस्क्यु फोर्सच्या तीन तास अथक प्रयत्नाला यश

मिरज : व्यसनाधीन आणि गुन्हेगारी प्रवृत्ती कडे वळालेल्या मुलाच्या त्रासाला कंटाळून त्याचे वडील राजेंद्र हंडीफोड यांनी त्यांचा मुलगा रोहित हंडीफोड याचा खून करून मिरजेतील गणेश तलाव येथे त्याच्या मृतदेहाचे भाग करून तलावात टाकले होते याबाबत राजेंद्र हंडीफोड यांनी स्वतः मिरज शहर पोलीस ठाण्यात हजर होऊन मुलाचा खून केलाचे सांगितले होते राजेंद्र हांडिफोड यांनी रोहितचा खून केल्यानंतर रोहितच्या शरीराचे काही भाग वेगळे करून काही भाग हे गणेश तलाव तर धड हे मिरज सुभाषनगर येथील शिंदे हॉल जवळ असणाऱ्या त्यांच्या प्लॉट मध्ये संशयित आरोपी राजेंद्र हंडीफोड यांनी टाकले होते राजेंद्र हांडीफोड यांनी रोहितचे उरलेले अवयव प्लास्टिक पोत्यात बांधून गणेश तलावामध्ये टाकले असल्याची माहिती दिल्यानंतर स्पेशल रेस्क्यू फोर्स आणि मिरज अग्निशमन दल यांची संयुक्त टीम तयार करून सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गिड्डे यांनी गणेश तलाव येथे रोहितचे शरीराचे अवयव शोधण्यासाठी शोध मोहीम राबवली सुमारे तीन तास गणेश तलाव येथे अथक प्रयत्नांनी दोन पोत्या मध्ये रोहितच्या शरीराचे भाग शोधून काढण्यात अखेर यश मिळाले आहे सदर रेस्क्यू करण्यासाठी अग्निशमन दलाचे विजय पवार आणि जवान आणि स्पेशल रेस्क्यू फोर्स चे कैलास वडर यांची टीम आणि महादेव अम्ब्युलन्स सर्व्हिस चे महादेव वनखंडे आकाश आणि त्यांची टीम उपस्थित होती.

## दोन आयफोन लंपास

सांगली : विश्रामबाग परिसरातील गणपती मंदिर जवळ असणाऱ्या एका अपार्टमेंटच्या उघड्या दरवाजातून आत प्रवेश करत घरात ठेवलेले दोन आयफोन मोबाईल चोरटयांनी लंपास केले. सदर चोरीची घटना हि बुधवार दि. ०२ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास घडली. या प्रकरणी अक्षय शंकर शिंदे (वय २५ रा. मूळ विटा सध्या सांगली) याने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## विट्यात पेट्रोल पंपावर ओमनी पेटली

विटा : विटा शहरातील सतत वर्दळीचा रोड म्हणून वाहनांची रहदारी याच रोडवर एक मारुती ओमणी व्हॅन ही रात्रीच्या वेळेत पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी गेले असतात सदर पेट्रोल भरल्यानंतर पंपावरून गाडी बाहेर निघताना अचानक गाडी रस्त्यावरच्या कडेला बंद पडली चालक यांनी पुन्हा गाडी सुरू करण्याचा प्रयत्न केला व अचानक गाडीत ने धूर येऊ लागला काही क्षणातच इंजन



पासून गाडीने पेट घेतला चालकाने वेळेत गाडीतून उडी मारल्याने चालकाचा जीव वाचला कोणतीही जीवित हानी झाली नाही या घटनेची माहिती विटा पोलीस व विटा नगरपरिषद अग्निशामक दल टीमने घटनास्थळी धाव घेतली विटा पोलीस वेळेवर पोहोचल्याने विटा पोलिसांनी व अग्निशामक दलाने व पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी मोठा प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. पेट्रोल पंपाच्या काही अंतरावरच ही ओमणी गाडी पेटल्याने आजूबाजूच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली सदर नागरिकांतून मिळालेली माहिती. विटा पोलीस अग्निशामक दल व पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी वेळेत सावधगिरी बाळगत पेट घेतलेल्या ओमनी चार चाकी गाडीची आग आटोक्यात

(पान २ वर)

## विटा शहरातील चोरीप्रकरणातील तीन संशयित आरोपींना अटक

विटा : खानापूर तालुक्यातील विटा (सुर्यनगर). विटा येथून दिनांक २६ /२/ २०२३ रोजी ते २७ रोजी शेळ्या चोरी झाल्याची तक्रार विटा (सूर्यनगर) येथील . प्रकाश बंडू सूर्यवंशी यांनी विटा पोलीस ठाण्यात शेळ्या चोरीची फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे कलम ३७९ प्रमाणे विटा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता . यासंदर्भात वरील चोरीचा तपास चक्रे वेगाने फिरवावीत असा आदेश सांगली जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ बसवराज तेली साहेब व अप्पर पोलीस अधीक्षक तुषार पाटील व विटा उपविभागिय पोलीस अधिकारी श्रीमती पद्मा कदम मॅडम यांच्या आदेशानुसार विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष डोके साहेब यांनी विटा




पोलीस ठाण्याकडील गुन्हे प्रकटीकरणकडील पोलीस आमलदार यांना तपासाच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने विटा पोलीस ठाण्याकडील गुन्हे अन्वेषण पथकातील अंमलदार हे विटा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना विटा पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल उत्तम माळी यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की. दोन अज्ञात इसम हे विना नंबर प्लेटची गाडी

(पान २ वर)

## जयंतीच्या मिरवणुकीत एकावर कोयत्याने हल्ला

सांगली : शहरातील संजयनगर परिसरातलोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त सुरु असणाऱ्या मिरवणुकीत नाचणाऱ्या व्यक्तीने एका वृद्धेला कोट्याने मारत असताना भांडणे सोडविण्यासाठी गेलेल्या तरुणीवर कोयत्याने हल्ला करत त्याला जखमी केल्याची घटना घडली. सदरचा प्रकार हा गुरुवार दि. ०३ ऑगस्ट रोजी रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास घडला. या प्रकरणी जखमी रोहित विठ्ठल सकटे (वय २० रा. संजयनगर) याने संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी विकास आबासो पवार याच्या विरोधात गुन्हा दाखल

(पान ५ वर)

## भिकवडी बुद्रुक येथून १५ लाखाचे सोन्याचे दागिने लंपास

विटा : खानापूर तालुक्यातील (भिकवडी बुद्रुक) येथे नववधूने सासरी कपाटात ठेवलेले सुमारे २५ तोळे सोन्याचे दागिने घेऊन पलायन केल्याचा प्रकार भिकवडी बुद्रुक येथे दिनांक ८ मार्च २०२३ रोजी घडला. सविस्तर मिळालेली माहिती अशी की श्रीपाद सदाशिव फडतरे (वय २८) यांनी विटा पोलिसात फिर्याद दिली श्रीपाद यांची पत्नी सोनल वय २३ वर्ष व सौरभ माळवे वय २६ राहणार वडूज तालुका खटाव जिल्हा सातारा. या दोघा विरोधात विटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे विटा पोलिसांनी सांगितले. सोनल चा पहिला विवाह झाला होता. सोनल व सौरभ यांनी नातेवाईकांची संगनमत करून श्रीपाद बरोबर सोनलचा २८ नोव्हेंबर २०२२ या रोजी विवाह केला. त्यांचा सुखी संसार विवाहित जीवन तीन महिने ठीक होते. आठ मार्चला भिकवडी बुद्रुक येथून सोनलने विटा येते ब्युटी पार्लरला जाण्याचा बनवा करून सौरभ शी संगनमताने कपाटात ठेवलेली चेन ब्रेसलेट सोने व तीन अंगठ्या मंगळसूत्र नेकलेस झुबे बांगड्या असे अंदाजे १५ लाख रुपये किंमतीची किमतीचे सुमारे २५ तोळे सोन्याचे दागिने घेऊन पोबार करून फसवणूक केल्याच्या विटा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेनंतर खानापूर तालुक्यातील भिकवडी बुद्रुक येथे एकच खळबळ उडाली आहे. सदर विटा पोलिसांनी या संदर्भात गुन्हा दाखल केला असून विटा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान खानापूर तालुक्यातील ( तांदळगाव) . येथे दुचाकीवरून दोन तरुण युवक दुपारच्या वेळेत अंगणवाडी नजीक आल्यानंतर तांदळगाव येथील अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करणाऱ्या मंगला शिवाजी चव्हाण यांच्या जवळ हे दोन तरुण युवक अंदाजे २० ते २२ वयोगटातील हे युवक असल्याचे समजले या युवकांनी चव्हाण या महिलेस आम्ही सोने पॉलिश करून देतो असे त्यांनी सांगितले. यावेळी गळ्यातील पंधरा हजाराचे साडेबारा ग्रॅमचे सोन्याचे गंठण त्या दोन तरुणाकडे पॉलिशीसाठी दिले. सदर त्या तरुणांनी हातचालाकी करून . सोबत आणलेल्या प्लास्टिकच्या पिशवीतील पावडर मध्ये गंठण घातल्याचा बहाण करून ती मंगल चव्हाण यांना दिले पिशवी वीस मिनिटांनी उघडा. असे त्या महिलेस सांगून ते दोन तरुण

(पान २ वर)






## सं | पा | द | की | य

# सेल्फीमुळे अनेकांचे बळी

सध्या लहान मुले, अबालवृद्ध आणि समस्त युवावर्गाला पर्यटनस्थळी गेल्यावर तेथील ठिकाणाची छबी, दृश्य टिपण्याची नवी क्रेज रूढ झाली आहे. आपापल्या मोबाईलव्दारे (सेल्फी) काढण्याची क्रेझ रूढ झाली आहे. फाजील आत्मविश्वास, अतिउत्साह, स्टंटगिरी करत अनेकजण अत्यंत धोकादायक ठिकाणी जावून मोबाईद्वारे सेल्फी काढतात. गड, किल्ले, उंच डोंगर, सुळके, खोल दऱ्या, धबधबे, कडेकपारी, गुहा, वेगवान जलप्रवाह, खोल जलाशये अशा विविध ठिकाणी पर्यटनाला गेल्यावर तेथील परिसरातील धोकादायक ठिकाणी सेल्फी काढण्याची क्रेज केवळ युवकांमध्येच नाही, तर सर्वांमध्ये वाढल्याचे वास्तव आहे. धोकादायक ठिकाणाच्या सेल्फीमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मागील काही वर्षांपासून १५ वर्षापासूनच्या मुलांसह युवक व युवतींमध्ये विविध प्रकारच्या नशापानाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हा विकृत संगतीचा परिणाम असून, युवापिढी विविध प्रकारच्या नशेच्या मोहजाळात अडकली आहे. मुलांमध्ये ड्रग्ज, दारू, चरस, गांजा, इतर अमली, पदार्थ, हुक्का आणि इतर नव्याने विकसित होणारे नवनवीन मादक पदार्थांचे व्यसन वाढले आहे. तसेच मद्यपानाच्या नशेसह अनेकांना सुसाट वेगाची नशाही लागली आहे. या रॅश (सुसाट) गाडी चालविण्याची विकृतीमुळे मागील काही वर्षात विविध महामार्ग, राष्ट्रीय मार्ग, रस्त्यांवर जीवघेण्या अपघातांचे प्रमाण वाढले असून, झालेल्या अपघातात अनेकांचे नाहक जीव गेले आहेत.आलिशान मोटारसायकली व चारचाकी वाहनांचे प्रचंड फॅड निर्माण झाले आहे. या अलिशान गाड्या चालविण्याचा, हाताळण्याचा मोह युवकांना शांत बसून देत नाही. या गोष्टींना अनेक पालकांचा लाड व पालकांचे मुलांकडे होणारे दुर्लक्ष कारणीभूत आहे. आलिशान बाईक आणि कार चालविताना तरुणांना वेगमर्यादेचे भान राहत नाही. अनेकजण नशेत सुसाट गाडी चालवीत वेगाच्या सीमाच ओलांडत असतात. काहीजण आपल्या सुसाट वेगाची छबी मोबाईल मध्ये टिपत वाहने जोरात दामटतात, वाहतूक नियम आणि वेग मर्यादेचे भान ठेवत नाहीत. या ठिकाणी येणाऱ्यांत विशेषतः पुणे, ठाणे, मुंबई परिसरातील विविध महाविद्यालयाच्या युवक, युवतींचे प्रमाण अधिक असते. रात्री सात व मध्यरात्री १२ नंतर हा युवा वर्ग समुहाने आलिशान गाड्यांतून येतात. याठिकाणी आजू बाजूला झाडीत, माळावर, कारमध्ये संगीताच्या तालावर ठेका धरत नाचत, खिदळत रात्रभर नशा करून पुन्हा पहाटे व सकाळी परतीचा मार्ग धरतात.अनेकवेळा जाता, येताना नशा आणि रात्रीच्या जागरणामुळे अपघात झाले आहे. आतापर्यंत झालेल्या अनेक अपघातात अनेकांचे जीव गेले आहे. तर अनेकजण गंभीर जखमी होऊन जायबंदी झाले आहेत. दारु आणि वेगाच्या नशेमुळे होणाऱ्या अपघातांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. ही बाब खेदजनक असून, कुटुंब आणि समाजाला दूरगामी विचार करायला लावणारी आहे. कमी वयात हातात येणारा पैसा. त्याच्या विनियोगाकडे पालकांचे होणारे दुर्लक्ष कारणीभूत आहे. या विकृतींना लगाम कोण घालणार, याचा विचार करायला लावणारा आहे.

# सुंदर नाते मैत्रीचे...



मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्रीही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रजवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री. अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री - पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड, जि. पुणे ९९२२५४६२९५**

# ऑल इंडिया पॅथर सेनेचे अध्यक्ष दिपक केदार यांनी घेतली बेडग गावची भेट

## ...नाहीतर एक विट एक सिमेंट पोते घेऊन बेडग पर्यंत लॉग मार्च काढू : दिपक केदार यांचा इशारा





मिरज : तालुक्यातील बेडग येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची कमान पाडल्याची घटना घडली.त्यानंतर आंबेडकरी समाजाने सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली होती.तरी देखील त्यांना न्याय मिळत नसल्याने २३ तारखेला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते प्रांताधिकारी कार्यालय पर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला होता.त्यानंतर् प्रशासनाने कारवाई केली नसल्याने उपोषण कर्त्यानी मुंडण आंदोलन केले यामध्ये पहिल्या दिवशी ५ उपोषण कर्त्यानी मुंडण केले.त्यानंतर दुसऱ्या दिवशी अजून ७ जणांनी मुंडण केले.त्यानंतर प्रांताधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला नोटीस काढल्यानंतर बांधकाम विभागाने बेडग येथील जिल्हा मार्गावरील सर्व अतिक्रमण जमीनदोस्त केली.आणि संरपच आणि भुरसे यांना प्रांताधिकारी यांनी ५२,५३ च्या नोटीस बजावली.त्यानंतर उपोषण कर्त्यानी उपोषण सोडले.त्यानंतर संरपच आणि उपसरपंच यांच्यावरच ट्रोसिटीचे गुन्हे दाखल झाले नसल्याने पुन्हा जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले आणि कारवाई करण्यासाठी समस्त आंबेडकरी समाजाने १० दिवसांचा अल्टिमेट दिला नाहीतर पालकमंत्र्यांच्या घरावर मोर्चा काढणार असल्याचे सांगितले.त्यानंतर तारीख जवळ येताच पोलिस अधीक्षक यांनी समस्त आंबेडकरी समाजाला बोलवून घेतले आणि तुम्हाला पालकमंत्री यांच्या घरावर मोर्चा काढता येणार नसल्याचे सांगितले.त्यावेळी न्याय मिळत नसल्याने समस्त आंबेडकरी समाजाने निर्णय घेतला.ज्या गावाला बाबासाहेबांचे नाव चालत नाही ते गाव आम्हाला नको असे बोलून आंबेडकरी समाजाने बेडग ते मंत्रालय असा लॉग मार्च काढण्याचे ठरविले.पहिल्या दिवशी त्यांनी लॉग मार्च काढला आणि मिरज मध्ये मुक्काम केला.दुसऱ्या दिवशी मिरजेतून परत मंत्रालयाच्या दिशेने लॉग मार्च निघाला आणि कसबे डिग्रज येथे थांबला.तिसऱ्या दिवशी इस्लामपूर येथे गेल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी आंबेडकरी समाजाची व्हिडिओ कॉल द्वारे विचारपूस केली आणि आपले शिष्टमंडळ घेऊन भेटायला या असे सांगितले.त्यानंतर शिष्टमंडळ भेटण्यासाठी गेले आणि भेटल्यानंतर सर्व चर्चा झाली आणि सरपंच आणि उपसरपंच यांच्यावर ट्रोसिटीचा गुन्हे दाखल करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले.आणि शासन ही कमान बांधून देईल असे आश्वासन ही यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.काल या कमान पाडल्या प्रकरणी ऑल इंडिया पॅथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी बेडग गावी भेट दिली.यावेळी समस्त आंबेडकरी समाजाने त्यांचे मोठ्या प्रमाणात स्वागत केले.बौध्द विहार मध्ये त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करुन आंबेडकरी समाजायासोबत चर्चा केली.तर त्यांनी मंत्री खाडे यांना पुन्हा आमदार होऊच देणार नाही असे वक्तव्य करून खाडेना इशारा दिला आहे.तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कमान बांधून देऊ असे आश्वासन दिले होते.३० दिवसांत फडणवीस यांनी ज्या काही प्रोसेस

असतील त्या संबंधित अधिकाऱ्यांना सांगून प्रोसेस करून ३० दिवसांत कमानीचे काम चालू करावे.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० दिवसांत कमानीचे काम सुरु केले नाही तर मुंबई ते बेडग असा भिमसैनिकांचा एक विट एक सिमेंट पोते घेऊन बेडग पर्यंत लॉग मार्च काढून आम्ही स्वत कमान बांधू असा इशारा दिपक केदार यांनी सरकारला आणि फडणवीस यांना दिला आहे.तर खासदार संजय पाटील आणि पालकमंत्री सुरेश खाडे यांचा देखील त्यांनी चांगलाच समाचार घेतला.तसेच बेडग येथील मागासवर्गीय वस्तीला सुधारणेसाठी २५ ते ५० कोटी रुपये द्यावेत अशी मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो शब्द दिला आहे तो पाळावा आणि कमान बांधून द्यावी असे वक्तव्य दिपक केदार यांनी केले आहे.यावेळी मोठ्या प्रमाणात समाज बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रवादी सांगली जिल्हा कार्यालय येथे एक तास राष्ट्रवादीसाठी बैठक संपन्न



सांगली : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.जयंत पाटील साहेब यांनी 'एक तास राष्ट्रवादीसाठी - आगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी - प्रभावी, प्रगल्भ, तरुण, पुरोगामी विचारांसाठी' या उपक्रमाची संकल्पना मांडली होती. या करिता दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी,संघटनेतील सर्वच फ्रंटल सेलच्या पदाधिकारी यांनी एकत्र बैठक आयोजित करून सर्वांनी बैठकीला उपस्थित राहुन,या बैठकीमध्ये,देशाच्या,राज्याच्या, जिल्ह्याच्या, तालुक्याच्या, सामाजिक, आर्थिक, राजकीय जडणघडणीची चर्चा या बैठकीत प्रामुख्याने होणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांगली शहरजिल्ह्याच्या वतीने शहरजिल्हाध्यक्ष संजयजी बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली व युवक शहरजिल्हाध्यक्ष राहुलदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी सांगली जिल्हा कार्यालय येथे एक तास राष्ट्रवादी साठी बैठक घेण्यात घेण्यात आलीसदर बैठकीत मणिपूर येथे घडवण्यात आलेल्या हिंसाचाराच किती भयावह आहे हे संपुर्ण देशाने पाहिले आहे, व जगातून यावर प्रतिक्रिया येत आहेत मात्र तेथील स्थानिक भाजप सरकार यांचे दुर्लक्ष असून मा. पंतप्रधान यांनीही मौन बाळगले आहे , बैठकीत या घटनेचा निषेध नोंदवण्यात आला

मनोहर कुलकर्णी/भिडे या व्यक्तीस पोलिस संरक्षण देऊन महापुरुषांचा वारंवार ठरवून अपमान करणाऱ्या शक्तीचा यावेळी निषेध नोंदवून समाजात पुरोगामी विचारातुन बंधूभाव एकोप्याचे वातावरण ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील असावे अश्या सर्व विषयांवर पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या कडून भावना व्यक्त करण्यात आल्या

यावेळी सांगलीचे महापौर दिग्विजय सुर्यवंशी , सांगली शहराध्यक्ष सागर घोडके , तानाजी गडदे ,उत्तम कांबळे, धनापल खोत,अनिता पांगम, वंदना चंदनशिवे ,वैशाली कळके, समीर कुपवाडे, धनंजय पाटील, युवराज गायकवाड , बिरेंद्र थोरात ,महंमद मनेर , हारून खतीब , डॉ शुभम जाधव , महालिंग हेगडे, अर्जुन कांबळे संगीता जाधव ,रामभाऊ पाटील प्रकाश सुर्यवंशी, कुमार वायदंडे, सुभाष तोडकर ,परवेज मुलाणी, जुबेर मुजावर , सचिन चव्हाण , समाधान मोहिते, अभिजित रांजणे,दत्ता पाटील ,जुबेर मुजावर, अजित पाटील, बी.एन कदम , आदर्श कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महावितरणाच्या भोंगळ कारभाराबद्दल मायणीत घेराव



मायणी : मायणी परिसरातील वीज ग्राहकांना येणाऱ्या वाढीव वीजबिला संदर्भात युवा नेते सचिन भिसे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मायणीकर या संघटनेच्या वतीने महावितरणाचे अधिकारी श्री नाटकर यांना घेरावा घालण्यात आला.प्रत्येक महिन्याला वीजमिटर चे रिडींग घेतले जात नाही ,शिवाय अंदाजे वीज बील देणे , वीज बिल वेळेवर न येणे इत्यादी अनेकअडचणी बाबत नाटकर साहेब यांना विचारणा करण्यात आली. दरम्यान मुख्य अभियंता श्री मस्के साहेब यांना मायणी व मायणी पंचक्रोशीतील महावितरणाच सुरू असलेल्या भोंगळ कारभारबदल सविस्तर सांगून सर्व नागरिकांच्या वतीने महावितरणाचे अधिकारी श्री.नाटकर यांना निवेदन देण्यात आले.या प्रसंगी जेष्ठ नागरिक, महिला व तरुण मोठया संख्येने उपस्थित होते.



# शिवपुत्र यांचें कडुन दिव्यांग लोकांना जिवनावशक किट वाटप

सांगली : जिल्ह्यातील विविध सामाजिक कार्या आणि सेवामध्यें अग्रेसर असलेल्या शिवपुत्र ग्रुप कडुन दिव्यांग लोकांना जिवनावशक किट वाटप करण्यात आले.तसेच श्रावण मास चे आयोजीत सोमवारी फराळ वाटप करण्यात येणार आहे.तसेच जिल्हातील विविध शिवमंदिर येथे फराळ वाटप करण्यात येणार आहे.कवलापुर, अंकली सागरेश्वर तसेच विविध ठिकाणीं करण्यात येणार आहे यासाठी मा सागर कुंभार तसेच डॉ महेश साळे सर तसेच अविनाश भगत,पापा भोरे यांचें मार्गदर्शन लाभले आहे.

(पान १ वरून)

## विट्यात पेट्रोल पंपावर ओमनी पेटली

आणल्याने आजूबाजूचा परिसरात मोठा अनर्थ टळला. पेट्रोल पंपावरील हात बम हा सुद्धा वेळेत त्या ठिकाणी कामी आल्याने दोन्ही पाण्याच्या फवाऱ्यामुळे आग आटोक्यात आणली यावेळी आजूबाजूच्या नागरिकांनी विटा पोलीस पथक व अग्निशामक दल कर्मचारी तसेच पेट्रोल पंपावरील कर्मचारी यांचे कौतुक केले. मात्र ही आग कोणत्या कारणाने लागली याची माहिती मिळू शकली नाही.

## भिकवडी बुद्रुक येथून १५ लाखाचे सोन्याचे दागिने लंपास

दुचाकीवरून तरुणांनी तिथून पोबारा केला. सदर चव्हाण यांनी त्या दोन तरुण युवकांनी वीस मिनिटानंतर पिशवी उघडून पहा असे सांगितल्याने चव्हाण यांनी पिशवी उघडून पाहिल्यानंतर गंठण नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी आजूबाजूला आरडा ओरडा केला परंतु त्या आज्ञात चोरट्यांनी तिथून धूम ठोकली होती. सदर चव्हाण यांनी विटा पोलीस ठाण्यात धाव घेतली वरील झालेला सर्व प्रकार विटा पोलिसांना सांगितला या संदर्भात विटा पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

## चोरीप्रकरणातील तीन संशयित आरोपींना अटक

घेऊन विटा ते आळसंद जाणारे रोडवर संशयितरित्या फिरत आहेत. ही माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्या मार्गावर सापळा रचून सदर हे दोन्ही इसाम त्या भागात फिरत असताना संशयित म्हणून त्या दोघांना विटा पोलिसांनी ताब्यात घेतले व त्यांना विटा पोलीस ठाण्यात आणून त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीस विटा पोलिसांना उडवा उडवीची उत्तरे दिली विटा पोलिसांनी खाक्या दाखवताच सदरची त्या दोघाजवळ सापडलेली मोटार सायकल ही आटपाडी येथून चोरी केली असल्याची कबुली दिल्याने. व तसेच त्यांच्याकडे सखोल तपास केला असताच त्यांनी अन्य गुन्हे केल्याची कबूली संशयित या चोरी प्रकरणात ताब्यात घेतलेले संशयित आरोपी ओंकार हणमंत बोडरे.( वय वर्षे २० रा.ताकारी) तालुका वाळवा. जिल्हा सांगली.तर दुसरा संशयित आरोपी विशाल उर्फ आकाश भीमाशंकर जाधव. ( वय वर्षे २४ राहणार सोन्याळ) तालुका जत. जिल्हा सांगली. असे सांगितले यावेळी आणखीन एक जण यामध्ये सहभागी असल्याचे सांगत त्याही संशयित आरोपी आकाश दीपक घाडगे. ( रा तुपारी. तालुका वाळवा . जिल्हा सांगली असे सांगितले.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# मिरज तालुका बार कॉन्सिलचे अध्यक्षपदी अॅड बी.एन.पाटील




मिरज : मिरज तालुका बार कॉन्सिलचे अध्यक्षपदी अॅड बी.एन.पाटील (बेडगकर)यांची निवड झाली. निवडीबद्दल मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मा.श्री.मनोजबाबा शिंदे-म्हैसाळकर यांनी अँड बी.एन. पाटील साहेब यांचा सत्कार केला.

या प्रसंगी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक श्री.बाळासाहेब होनमोरे,मिरज तालुका राष्ट्रवादीचे कार्यध्यक्ष श्री.वास्कर शिंदे,मिरज पंचायत समितीचे माजी सभापती श्री खंडेराव जगताप,,मिरज तालुका राष्ट्रवादी विधानसभा क्षेत्राचे कार्यध्यक्ष श्री.गंगाधर तोडकर,विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष श्री.प्रमोद इनामदार,ॉ श्री.आप्पासो खोत,उपस्थित होते.

# विट्यातील श्री पंचमुखी गणपती मंदिरात भाविकांच्या खिशातील पैशावर डल्ला

विटा : शहरातील मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात असलेले श्री पंचमुखी गणपती मंदिरात अंगारकी संकष्टी असो अथवा अन्य संकष्टी असो व इतर दैनंदिन दिवशी सतत श्री गणरायांच्या दर्शनासाठी भक्तजन भाविकांची गर्दी असते. शुक्रवार हा संकष्टीचा दिवस होता या दिवशी गणरायांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी होती. संकष्टी सुटण्यावेळी रात्री श्री पंचमुखी गणेश मंदिरामध्ये आरतीच्या वेळी भक्तजन भाविकांची मोठी गर्दी असते यावेळी संकष्टीच्या निमित्ताने गणरायांच्या दर्शनासाठी आलेले काही भाविक यामध्ये विटा शहरातील एका ज्वेलर्समध्ये काम करणारे श्री पोपट महादेव घोडके हे आपल्या कुटुंबासह विटा शहरातील मायणी रोड येथील दुकान बंद झाल्यानंतर बाईने रोडवरील एटीएम मधून पैसे काढून. आल्यानंतर त्यांनी सहकुटुंबासह गणपती मंदिरात येऊन संकष्टी निमित्ताने दर्शन घेत असताना. काही अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत प*** घोडके यांच्या मागील खिशातून साडेसहा हजार रुपये




हातोहात लंपास केले. सदर आरती व गर्दीचा प्रवास जास्त असल्याने घोडके यांच्या लवकर लक्षात आले नाही यानंतर पेट्रोल पंपावर पेट्रोल भरायला गेले असतात पेट्रोलचे पैसे देण्यासाठी मागील खिशामध्ये हात घातल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आपल्या पाठीमागील खिशातील मंदिर परिसरात कुणीतरी पैसे चोरले. त्यांनी पुन्हा मंदिरामध्ये येऊन त्या ठिकाणी आजूबाजूला पाहिले परंतु कुठेही त्यांना त्यांच्या पाठीमागील असणारे व्यक्तिमत्व आढळून आले नाही. श्री गणपती मंदिरातच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी भक्ताच्या खिशावर डल्ला मारला.

सदर श्री पंचमुखी गणपती मंदिरामध्ये मागील ही काही दिवसापूर्वी असाच स चोरीचा प्रकार घडून आला होता. त्यामुळे संबंधित श्री पंचमुखी गणपती मंदिराची देखभाल व पूजाअर्चा करणारे जबाबदारी व्यक्ती यांनी श्री पंचमुखी गणपती मंदिरा परिसरात सीसीटीव्ही फुटेज बसवणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून एखादी घटना घडली तर पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज मुळे एखाद्या घटनेचा तपास करता येतो. मुळात आजपर्यंत तिथं काही घटना घडल्या नाहीत . पण खबरदारी घेणं गरजेचं असल्याचे भक्तजन भाविकातून व विटेकर नागरिकांतून बोलले जात आहे.

# पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथे समाधान मेळाव्यात ९४८ प्रकरणांचा निपटारा

भिलवडी : रामानंदनगर ता.पलूस येथे समाधान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत या करण्यात आलेल्या मेळाव्या मध्ये नागरिकांची ९४८ कामे मार्गी लागली अशी माहिती तहसीलदार निवास ढाणे यांनी दिली.यावेळी आमदार अरुण अण्णा लाड, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र आप्पा लाड, प्रांताधिकारी अजय शिंदे, नायब तहसीलदार बबन करे, माजी सभापती दीपक मोहिते, गणपतराव सावंत, मिलिंद भैय्या पाटील, सरपंच सुमय्या कोल्हापुरे ,माजी सरपंच जयसिंग नावडकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी महसूल विभाग , पंचायत समिती, आरोग्य विभाग, कृषी विभाग , वीज वितरण, एकात्मिक बाल विकास योजना ,परिवहन विभाग ,आरोग्य विभाग असे सर्व विभाग उपस्थित होते .यावेळी आमदार अरुण अण्णा लाड , महेंद्र आप्पा लाड ,माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिव्यांगांना तसेच नागरिकांना तात्काळ शिधावाटप संजय गांधी योजनेची मंजुरीची पत्र शपथपत्र देण्यात आली. यावेळी सरपंच सुमैया कोल्हापुरे यांनी आभार मानले, सूत्रसंचालन विनया कुलकर्णी यांनी केले. स्वागत तहसीलदार निवास ढाणे यांनी केले. यावेळी बोलताना तहसीलदार निवास ढाणे म्हणाले, जिल्हाधिकारी मा.डॉ.राजा दयानिधी यांच्या मार्गदर्शनाखाली हा समाधान मेळावा यशस्वीरित्या संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये महसूल विभागातील पुरवठा विषयक कामे, शिधापत्रिका ,दुबार शिधापत्रिका ,संजय गांधी योजना ,कृषी विभागातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म ठिबक योजना, प्रधानमंत्री पीक योजना, जमीन आरोग्य पत्रिका, रमाई आवास योजना ,दिव्यांग व्यक्तीस घरकुल योजना, नवीन गोठा बांधणी बाबत माहिती, मालमत्ता उतारे, जंतनाशक औषधे ,लंपी लसीकरण आणि वंध्यत्व तपासणी शिबिर व उपचार, नगरपालिका अंतर्गत जन्म प्रमाणपत्र ,विवाह नोंदणी प्रमाणपत्र, परिवहन खात्यांतर्गत एसटी महामंडळ योजनां चे मार्गदर्शन, वीज वितरण अंतर्गत नवीन कनेक्शन, अर्ज स्वीकारणे, बिल तक्रार अर्ज स्वीकारणे, भूमी अभिलेख खात्यातील ड्रोन सर्वेक्षण माहिती, सनद वाटप आरोग्य विभागांतर्गत रक्तातील साखर चेक करणे, रक्तदाब तपासणी, कृषी विभागांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री पीक योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना या संदर्भातील ९४८ कामांचा निपटारा करण्यात आला .प्रांताधिकारी अजय शिंदे यांच्या उपस्थितीत व तहसीलदार निवास ढाणे यांच्या नियोजनामुळे हा मेळावा यशस्वीरित्या संपन्न झाला उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले

# महाराष्ट्र चेंबरच्या औद्योगिक संघटनेच्या तज्ञ समिती उपाध्यक्षपदी रमेश आरवाडे यांची निवड



**बंधुता न्यूज नेटवर्क**

कुपवाड : कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ इंडस्ट्रीज अँड कॉमर्स माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक रमेश आरवाडे यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रि अँड अँग्रीकल्चर मुंबईच्या औद्योगिक संघटनेच्या तज्ञ समितीच्या उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

शतक महोत्सवाकडे वाटचाल करीत असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रि अँड अँग्रीकल्चर' च्या कामकाज प्रक्रियेमध्ये तज्ञ समितीचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. विशेषता औद्योगिक संघटना समिती कडून राज्यातील विविध औद्योगिक संघटना यांच्याशी संपर्क स्थापित करून त्यांच्याशी चेंबरचे संबंध वाढवण्यासाठी समन्वय साधणे, औद्योगिक संघटना यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर संबंधित कार्यालय व प्राधिकरणाकडे योग्य तो पाठपुरावा करणे आणि समस्यांचे निराकरण करण्यात मदत करणे ही प्रामुख्याने जबाबदारी त्यांच्याकडे असणार आहे. त्यांच्या या निवडीने उद्योग जगतातून त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# हिंदकेसरी गणपतराव आंदळकर ;स्मारक पालकमंत्र्यांनी केली शिफारस



शिराळा : देशाचे भूषण असलेल्या हिंदकेसरी गणपतराव आंदळकर यांची पुनवत तालुका शिराळा येथे जन्मगावी स्मारक ,वस्तू संग्रहालय व क्रीडांगण व्हावे यासाठी पालकमंत्री सुरेश खाडे यांनी मुख्यमंत्री व राज्याच्या क्रीडा मंत्र्यांना शिफारस केली आहे. हिंदकेसरी गणपतराव आंदळकर यांच्या स्मारकासंदर्भात दत्तात्रय आंदळकर, संजय मेठे ,गजेंद्र कुलोली ,अशोक पाटील, संदीप पाटील यांनी नुकतीच पालकमंत्री सुरेश खाडे यांची भेट घेतली .हिंदीकेसरी अर्जुनवीर गणपतराव आंदळकर यांची पुनवत जन्मभूमी आहे. आंदळकरांनी सांगली ,कोल्हापूरसह राज्याचे नाव देशात तसेच आशियाई व ऑलम्पिक स्पर्धेत केले.१९६० साली पंजाबच्या खडकसिंगला चितपट करून त्यांनी हिंदकेसरीची गदा पटकावली. १९६४ ला भारत सरकारने त्यांना अर्जुनवीर व १९८२ ला महाराष्ट्र शासनाने त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देऊन सन्मान केला आंदळकर यांचे निधन २०१८साली झाले. त्याच्या स्मृतिप्रित्यर्थ पुनवत येथे स्मारक व्हावे ,अशी मागणी केली. याबाबत पालकमंत्री सुरेश खाडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्याकडे शिफारस केली आहे.

# चांदोली परिसरात भात लावणीला वेग

शिराळा : शिराळा तालुक्याच्या पश्चिम विभागात संतधार पावसातच शेतकरी बैलाच्या साह्याने चिखलगुठ्ठा पद्धतीने भात रोपांची कामे गतीने करतांना चे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. त्यामुळे भात रोपांची लागण करण्याच्या कामाला गती आली आहे. पावसाचे ओढ्या नाल्याचे पाणी शेतात आणून बैलांच्या नांगरटीने शेतात चिखलाचा गुठ्ठा करून त्याचेवर भाताच्या रोपांची लागण केली जात आहे. त्या कामात शेतकरी व महिला मग्न आहेत .सध्या हे चित्र शिराळा तालुक्याच्या पश्चिम विभागात व शाहूवाडी तालुक्याच्या उत्तर भागात सर्वत्र पहावयास मिळत आहे.

शिराळा तालुक्याच्या पश्चिम विभागातील चांदोली धरण परिसर हा पावसाचा आगर म्हणून ओळखला जातो. येथील वार्षिक पर्जन्यमान सरासरी चार ते साडेचार हजार मिलिमीटर असते. परंतु चालू वर्षी पावसाने उशिरा केलेल्या सुरुवातीमुळे रोप लावणीला उशिरा सुरुवात झाला .सध्या रोप लावण्याची धामधूम चालू आहे .चालू वर्षी जुलै पासून

आज अखेर ९४९ मिलिमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली आहे. गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून पश्चिम भागात संतधार तर कधी मुसळधार पाऊस पडत आहे. हा पाऊस भात व ऊस पिकास पोषक आहे. सद्या पावसात रोप लावण्याची व



भांगलनीची कामे सुरू आहे.

या परिसरातील शिराळा तालुक्यातील खुंदलापूर धनगरवाडा मनदुर, मनदुर धनगरवाडा,सोनवडे, खोतवाडी, बेरडेवाडी, मीरुखेवाडी, गुढे पाचगणी पठार, बांबरवाडी, येसलेवाडी भाडुगळेवाडी आरळा,तर शाहूवाडी तालुक्यातील उखळू, शित्तूर वारून, खेडे, डिगेशिराळे, सोडोली, कांडवण, विरळे यासह डोंगरदऱ्यातील व डोंगर पठारावरील शेतामध्ये काही ठिकाणी धुळवाप भात पेरण्या केल्या जातात .तर उर्वरित शेतीमध्ये जवळपास ६०% शेती चिखलगुठ्ठा पद्धतीने भाताची रोप लागण केली जाते. भाताची रोपे शेतात एका बाजूला रानातील पालापाचोळा जाळून तिथे रोपे तयार केली जातात त्यानंतर साधारण जुलै महिन्यात रोप लागण्याची कामे केली जातात. पण यावर्षी पावसाने उशिरा सुरुवात केल्याने रोप लावणीलाही उशीर झाला आहे. पण गेले दहा ते पंधरा दिवस पावसाने चांगलाच जोर धरल्याने भात रोपांच्या लागणीच्या कामाना गती आली आहे .संपूर्ण शेतात ओढ्या नाल्याचे पाणी सोडून रान बैलांच्या सहाय्याने छोट्या नांगरीने नांगरले जाते. त्यानंतर लाकडी फनाच्या सहाय्याने चिखलाचा गुठ्ठा केला जातो रानातले संपूर्ण तन चिखलात कुजवले जाते त्यानंतर एक सारखे रान झाले की मग भाताची रोपे महिला पुढून मागे मागे लावत येतात.




# वोविनाम राज्यस्तरीय स्पर्धेसाठी टीम रवाना

**बंधुता न्यूज नेटवर्क**



विटा : विट्यातील कु यासीन राज ,कु नारायण मोगरे कु शुभम जाधव कु धनंजय हळहळी या खेळाडूची राज्यस्तरीय वोविमान स्पर्धेसाठी निवड झाली या खेळाडूंना विटा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष डोके सर व सांगली जिल्हा वोविनाम असोसिएशनचे अध्यक्ष श्री राजेश जाधव सर यांच्या हस्ते खाऊ वाटप व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सांगली जिल्हा वोविनाम असोसिएशनचे सचिव श्री रवींद्र पवार,विटा पोलीस ठाण्यातील अधिकारी, व पत्रकार श्री शिराज शिकलगार ,इंडिया न्युज २८ चे पत्रकार उपस्थिती होते या खेळाडूंना क्रीडा शिक्षिका सानिका राजेश जाधव मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले सदरील खेळाडू हे सौ विजयमाला पतंगराव कदम प्रशाला विटा चे विद्यार्थी आहेत शाळेचे कार्यवाहक श्री योगेश्वर मिटकरी सर व शाळेच्या मुख्याध्यापक कोळेकर मॅडम यांनी शुभेच्छा दिल्या

# जाहीर टेंडर नोटीस २०२२-२३

ग्रामपंचायत खरसुंडी ता-आटपाडी,जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहरबंद निविदा ब-१ करारावर मागविणेत येते आहेत. तरी खाली नमूद केलेल्या कामा समोर दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमध्ये निविदा मागणी अर्ज दिले नंतर निविदा फॉर्म दिले जातील.तसेच मुदतीत आलेल्या निविदाचाच फक्त विचार केला जाईल. लिफाफा क्र (१) तांत्रिक लिफाफा क्र २) आर्थिक लिफापा मंजूर २०२२-२३ मधील निविदा उघडण्याची तारीख १८-०८-२०२३ रोजी सका. १०.०० वाजता.

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार | बँकेचे नाव, खाते नं.व शाखा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे खरसुंडी ता. आटपाडी येथील जानकर वस्ती येथे स्मशान भूमी बांधणे. | जनसुविधा | ४९९९९९/- | ब -१ | २००/- | ५०००/- | ७-८-२०२३ | १४-८-२०२३ सांय. ५ वा. | ३ महिने | मजूर | सांगली जि.म.बँक लि. शाखा - खरसुंडी ०२१०५०९०००००५२ |
| २ | मौजे खरसुंडी ता. आटपाडी येथे जलजीवन मिशन अंतर्गत वैयक्तिक नळ जोडणी | जलजीवन मिशन | ९१०३६४/- | ब -१ | २००/- | ९२००/- | ७-८-२०२३ | १४-८-२०२३ सांय. ५ वा. | ३ महिने | सुभे | सांगली जि.म.बँक लि. शाखा - खरसुंडी ०२१०५०९०००००५२ |
| ३ | मौजे खरसुंडी ता. आटपाडी येथे बौध्द विहार समाज मंदिर दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी | १४४८५२/- | ब -१ | २००/- | १५००/- | ७-८-२०२३ | १४-८-२०२३ सांय. ५ वा. | ३ महिने | ओपन | सांगली जि.म.बँक लि. शाखा - खरसुंडी ०२१०५०९०००००५२ |

अटी व शर्ती १) सदर निविदा स्वीकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.२)सविस्तर निविदा सुचना ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. ३) पूर्ण भरलेला मोहरबंद निविदा फॉर्म सोबत -लिफाफा क्र (१)मध्ये १)निवेदा फी आणि बयाना रक्कम भरलेली पावती/डीडी २) पॅन कार्ड ३) ZP/MGP व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र /बांधकाम नोदणी प्रमाणपत्र ४) जीएसटी नोदणी प्रमाणपत्र ५) इन्कम टक्स रिटर्न ६) निविदेतील अटी शर्ती मान्य असलेचे हमी पत्र सोबत जोडावे (लेजर पेपर वर ) ८) सदरचे काम उपअभियंता सो.पं.स.आटपाडी यांचे मार्गदर्शनव सूचनेप्रमाणे व दिलेल्या मुदतीत पूर्ण करणेचे आहे.९) सदर कामाचे बिल मुल्याकन प्राप्त झालेनंतर अदा केले जाईल. १०)कामाच्या बिलातून शासकीय नियमाप्रमाणे आवश्यक त्या सर्व कपातीच्या रक्कमा कपात करूनच बिल अदा केले जाईल.११) सुरु असलेल्या कामाचे दाखले सोबत जोडावीत १२) यापूर्वी केलेली कामे (कामाचा अनुभव) काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.१३) वरील काम करिता ZP/MGP व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र / पाणीपुरवठा नोदणी प्रमाणपत्र लिफाफा क्रमांक (२) सोबत(अ)टेंडर फॉर्म सही सह आवश्क.

XXX
ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत खरसुंडी
ता.आटपाडी जि.सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत खरसुंडी
ता.आटपाडी जि.सांगली

